महाराष्ट्र शासन
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**
**दूरध्वनी क्र. ०२०-२६१२२६०३/२६१२२०७६ Email ID:dirtpvd.pune@maharashtra.gov.in Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in ddtpho_pune@rediffmail.com**

---

## कार्यालयीन आदेश

**विषय :** **माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम ५ (१) व (२) आणि १९ नुसार** शासकीय माहिती अधिकारी , सहायक माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी पदनिर्देशित करणेबाबत.

**संदर्भ :**
१) मुख्य कार्यालयाचे आदेश क्र.आस्था/मा.आधि/२००५/प्रशासन-एक/४८९५, दि.०१ ऑगस्ट,२०१५.
२) मुख्य कार्यालयाचे आदेश क्र.आस्था/मा.आधि/२००५/सन-२०२३/प्रशा-१ब/ ५०९, दि.०३.०२.२०२३.
३) शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.आढावा-६१२२/१५३२/ प्र.क्र. ७५/नवि-२७, दि.१०.०४.२०२३.

प्रस्तावना:

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीकरिता कलम ५ (१) व (२) आणि १९चे तरतूदी नुसार प्रथमतः संदर्भित क्र.१ च्या कार्यालयीन आदेशान्वये, जन माहिती अधिकारी, सहायक जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी पदनिर्देशित करण्यात आले आहेत. या आदेशामध्ये त्या-त्या वेळेच्या आवश्यक बदलांनुसार वेळोवेळी पदनिर्देशित प्राधिकाऱ्यांमध्ये अशंतः बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार आतापर्यंत, नगर रचना संचालनालयाची, सन २०२३ ची माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४ चे तरतूदी अन्वये, १७ मुद्यांची माहिती, त्यासोबतची विवरणपत्रे व परिशिष्टांसह नगर रचना संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली असून, त्यातील परिशिष्ट-सात मध्ये या माहितीचा समावेश आहे.

आता, शासनाच्या, नगर विकास विभागाकडील संदर्भित क्र.३ च्या शासन निर्णयान्वये, नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागाचा सुधारित आकृतीबंध मंजूर झाला असून, या शासन निर्णयान्वये संचालनालयात "मुख्य प्रशासन अधिकारी" हे पद श्रेणी सुधारणा होऊन, ते नव्याने निर्माण झाले आहे. याबरोबरच काही कार्यालये बंद/नवीन कार्यालय कार्यान्वित/दर्जोन्नत झालेली असून त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयातील "प्रशासन अधिकारी" हे पद श्रेणी सुधार (upgrade) करुन, " मुख्य प्रशासन अधिकारी" हे पद निर्माण झाले आहे.

कृ.मा.प...

२) संदर्भित क्र.१ च्या आदेशा सोबतच्या प्रपत्रातील अ.क्र.२ येथे नमूद, सहसंचालक, नगर रचना, अंमलबजावणी कक्ष, पुणे या कार्यालयाऐवजी सहसंचालक, नगर रचना, संगणकीकृत नियोजन कक्ष (डिजीटल प्लानिंग सेल), पुणे हे कार्यालय नव्याने कार्यान्वित झाले आहे. याबरोबरच या आदेशासोबतच्या प्रपत्रातील औरंगाबाद विभागातील अ.क्र.६) येथे नमूद सहायक संचालक, नगर रचना, वाहतूक व परिवहन, औरंगाबाद हे कार्यालय उपसंचालक, नगर रचना, वाहतूक व परिवहन, छत्रपती संभाजीनगर या नामाभिधानाने तसेच, पुणे विभागातील अ.क्र.११) येथे नमूद नगर रचनाकार, बारामती शाखा हे कार्यालय सहायक संचालक, नगर रचना, बारामती शाखा व नाशिक विभागातील अ.क्र.७) येथे नमूद लवाद, नगर रचना, योजना, श्रीरामपूर हे कार्यालय सहायक संचालक, नगर रचना, श्रीरामपूर या नामाभिधानांनी ही सर्व कार्यालये दर्जोन्नत करण्यात आलेली आहेत.

३) संदर्भित क्र.१ च्या आदेशा सोबतच्या प्रपत्रातील अ.क्र.३) येथे नमूद कार्यकारी अभियंता, अंमलबजावणी कक्ष, नगर रचना, पुणे, अ.क्र.४) येथे नमूद उपअभियंता, अंमलबजावणी कक्ष, नगर रचना, पुणे, याबरोबरच त्या-त्या विभागीय कार्यालयातील अ.क्र.९) येथे नमूद, उपअभियंता, अंमलबजावणी कक्ष, नगर रचना, कोकण उपविभाग, अ.क्र.९) येथे नमूद उपअभियंता, अंमलबजावणी कक्ष, नगर रचना, उपविभाग नाशिक, अ.क्र.८) येथे नमूद कार्यकारी अभियंता, अंमलबजावणी कक्ष, नगर रचना, नागपूर विभाग, अ.क्र.९) येथे नमूद उपअभियंता, अंमलबजावणी कक्ष, नागपूर उपविभाग, नागपूर, अ.क्र. ७) येथे नमूद उपअभियंता, अंमलबजावणी कक्ष, नगर रचना, अमरावती व अ.क्र.१६) येथे नमूद उपअभियंता अंमलबजावणी कक्ष, नगर रचना, औरंगाबाद ही सर्व कार्यालये कमी/बंद झालेली आहेत.

याप्रमाणे संदर्भित क्र.१ च्या आदेशान्वये घोषित करण्यात आलेल्या पदनिर्देशित प्राधिकाऱ्यांमध्ये अ.क्र.१) येथे नमूद नुसार प्राधिकारी पदनिर्देशित करणे आणि अ.क्र.२) व ३) येथे नमूद प्रमाणे, जी कार्यालये नव्याने कार्यान्वित झालेली आहेत व जी कार्यालये दर्जोन्न्त झालेली आहेत. यानुसार जी कार्यालये बंद झाली आहेत, ती कार्यालये वगळून व नव्याने निर्माण झालेल्या पदाप्रमाणे/दर्जोन्नत झालेल्या कार्यालयातील पदनिर्देशित प्राधिकाऱ्यांमध्ये अशंतः बदल/निरसित करणे आवश्यक आहे. त्यानुसार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम-५(१) व (२) चे तरतूदीन्वये तसेच कलम-१९ चे तरतूदी नुसार प्राप्त अधिकारान्वये संदर्भित क्र.१ चे आदेश अद्ययावत करण्याच्या दृष्टीने संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहेत.

**-: आदेश :-**

i) संदर्भित क्र.१ च्या आदेशा सोबतच्या प्रपत्रामध्ये प्रस्तावनेतील अ.क्र.१) व २) येथे नमूद प्रमाणे नव्याने निर्माण झालेल्या श्रेणी सुधारणे प्रमाणे तसेच नामाभिधान बदलून दर्जोन्नत झालेल्या कार्यालयांतील या आदेशा सोबतच्या प्रपत्रामध्ये, त्या त्या कार्यालयाचे राज्य जनमाहिती अधिकारी, तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी, या आदेशान्वये नव्याने पदनिर्देशित करण्यात येत आहेत.

कृ.मा.प.

ii) प्रस्तावनेतील अ.क्र.३) येथे नमूद कार्यालयांतील सर्व पदनिर्देशित प्राधिकारी या आदेशान्वये निरसित करण्यात येत आहेत.

iii) वरीलप्रमाणे बदलांव्यतिरिक्त संदर्भित क्र. १ च्या आदेशातील उर्वरित तसेच या आदेशाच्या अनुषंगाने त्या-त्या वेळेसच्या आवश्यक बदलांनुसार वेळोवेळी पदनिर्देशित आदेशानुसार सर्व पदनिर्देशित अधिकाऱ्यांमध्ये कोणताही बदल नाही.

०२. संदर्भित क्र.१ च्या आदेशामन्वये व त्या-त्या वेळेसच्या आवश्यक बदलांनुसार वेळोवेळी पदनिर्देशित केलेल्या, जनमाहिती अधिकारी, सहायक जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेले माहिती अर्ज/प्रथम अपील अर्ज हे त्यावेळेसच्या संबंधित जनमाहिती अधिकारी, सहायक जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनीच अधिनियमातील तरतूदीनुसार निर्गत करावेत.

०३. सदरहू आदेश नगर रचना संचालनालयाचे www.dtp.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

(मुळ मसूदा मा.संचालक यांनी मंजूर केला असे)

जा.क.आस्था/मा.आधि/२००५/सन-२०२३/प्रशा-१ब/२२१०
मध्यवती कार्यालये, पुणे : ४११ ००१.
दिनांक : १८ मे, २०२३

(वि.दुं.तळपे)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता .

**प्रत :- माहितीस्तव सादर.**

१) मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग (नवि-२७/३/६) मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा.राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ, पुणे/नाशिक/औरंगाबाद/कोकण/बृहन्मुंबई/नागपूर/अमरावती.
३) मा.महसूल विभागीय आयुक्त पुणे /कोकण /नाशिक /नागपूर /अमरावती / औरंगाबाद.

**प्रत** :- संचालक तथा सहसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांना माहितीस्तव.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) सहसंचालक, नगर रचना, मूल्यांकन,महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) सहसंचालक, नगर रचना, पुणे /कोकण /नाशिक /नागपूर / अमरावती / औरंगाबाद विभाग.

**/- वरील १ ते २ मध्ये नमूद कार्यालयांनी त्यांच्या विभागातील सर्व कार्यालयांना याबाबत अवगत करावे.**

३) सहसंचालक, नगर रचना, संगणकीकृत नियोजन कक्ष, (डिजीटल प्लानिंग सेल), पुणे.
४) उपसंचालक, नगर रचना, नागरी संशोधन घटक, मुख्य कार्यालय, पुणे.

**/-यांनी सदरचे आदेश संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही विनाविलंब करावी.**

कृ.मा.प....

५) उपसंचालक, नगर रचना, वाहतूक व परिवहन, छत्रपती संभाजीनगर.
६) सहायक संचालक, नगर रचना, बारामती शाखा, जि.पुणे.
७) सहायक संचालक, नगर रचना, श्रीरामपूर शाखा, जि.अहमदनगर.
८) मुख्य प्रशासन अधिकारी, मुख्य कार्यालय, पुणे.
९) कार्यासन अधिकारी, टीपीव्ही - १/२/३/४/५/६, मुख्य कार्यालय,पुणे.
१०) कार्यासन अधिकारी, प्रशा-१/१३अ/अभिलेख, मुख्य कार्यालय, पुणे.

/- **अभिलेख कार्यासनाने सदरचे आदेश संचालनालयाच्या नोटीस बोर्डावर डकविण्याची कार्यवाही करावी.**

११) श्री.पालकर (स्वी.स.)/श्रीमती दाभाडे/श्री.चंद्रस, उश्रेलले, मुख्य कार्यालय, पुणे.

परिशिष्ट-७

प्रपत्र

**केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम ५(१) व (२) आणि १९ नुसार सहायक शासकीय माहिती अधिकारी, शासकीय माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या नियुक्ती बाबतचा अशंत: बदल दर्शविणारा तपशील**

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव | राज्य जन माहिती अधिकाऱ्याचे पदनाम | राज्य सहायक जन माहिती अधिका-याचे पदनाम | विषय | राज्य जन माहिती अधिका-याच्या कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक | अपिलीय अधिकाऱ्याचे पदनाम | अपिलीय अधिकाऱ्याच्या कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे | मुख्य प्रशासन अधिकारी | सर्व संबंधित अधीक्षक, मुख्य कार्यालय, पुणे | आस्थापना विषयक बाबी | मध्यवर्ती कार्यालये इमारत, तळमजला, पुणे- ४११००१ ०२०-२६१२२०७६ | उपसंचालक, नगर रचना, मुख्य कार्यालय, पुणे | मध्यवर्ती कार्यालये इमारत, तळमजला, पुणे- ४११००१ ०२०-२६१२२०७६ |
| २ | सहसंचालक, नगर रचना, संगणकीकृत नियोजन कक्ष (डिजीटल प्लानिंग सेल), पुणे | ज्येष्ठतम नगर रचनाकार | सर्व संबंधित सहायक नगर रचनाकार | भौगोलिक माहिती यंत्रणा (GIS) संगणक प्रणालीवर विकास योजना करण्याच्या अनुषंगाने सर्व तांत्रिक बाबी. | मध्यवर्ती कार्यालये, विस्तारित इमारत, पहिला मजला, पुणे- ४११००१ ०२०-२६१२६७४२ | सहायक संचालक, नगर रचना. | मध्यवर्ती कार्यालये, विस्तारित इमारत, पहिला मजला, पुणे- ४११००१ ०२०-२६१२६७४२ |
| | | | अधीक्षक | आस्थापनाविषयक बाबी | | | |

कृ.मा.प.

## औरंगाबाद विभाग

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव | राज्य जन माहिती अधिका-याचे पदनाम | राज्य सहायक जन माहिती अधिका-याचे पदनाम | विषय | राज्य जन माहिती अधिका-याच्या कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक | अपिलीय अधिकाऱ्याचे पदनाम | अपिलीय अधिकाऱ्याच्या कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| २ | उपसंचालक, नगर रचना, वाहतूक व परिवहन, छत्रपती संभाजीनगर | नगर रचनाकार | सर्व संबंधित सहायक नगर रचनाकार | महाराष्ट्र राज्यातील वाहतूक व परिवहन संबंधातील तांत्रिक बाबी | कौशल्य, प्लॉट नं.११, पहिला मजला, खडकेश्वर मंदिराजवळ, सांस्कृतिक क्रीडा मंडळासमोर, ज्युबिली पार्क, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ ०२४०-२३२२४९३ | उपसंचालक, नगर रचना, वाहतूक व परिवहन, छत्रपती संभाजीनगर | कौशल्य, प्लॉट नं.११, पहिला मजला, खडकेश्वर मंदिराजवळ, सांस्कृतिक क्रीडा मंडळासमोर, ज्युबिली पार्क, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ |
| | | | वरिष्ठ लिपीक | आस्थापनाविषयक बाबी | | | |

कृ.मा.प.

## नाशिक विभाग

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव | राज्य जन माहिती अधिका-याचे पदनाम | राज्य सहायक जन माहिती अधिका-याचे पदनाम | विषय | राज्य जन माहिती अधिका-याच्या कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक | अपिलीय अधिकाऱ्याचे पदनाम | अपिलीय अधिकाऱ्याच्या कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| २ | सहायक संचालक, नगर रचना, श्रीरामपूर शाखा, श्रीरामपूर, जि.अहमदनगर | नगर रचनाकार | सर्व संबंधित सहायक नगर रचनाकार | म.प्रा.नि.व न.र., अधि., १९६६ च्या अनुषंगाने श्रीरामपूर शाखा अंतर्गत बाबी व इतर सर्व तांत्रिक बाबी | सौ.सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल, हॉल क्र. १०५, आकाशवाणी केंद्राजवळ, सावेडी, अहमदनगर-४१४००४ ०२४१-२४२८५८१ | सहायक संचालक, नगर रचना, श्रीरामपूर | सौ.सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल, हॉल क्र. १०५, आकाशवाणी केंद्राजवळ, सावेडी, अहमदनगर-४१४००४ ०२४१-२४२८५८१ |
| | | | वरिष्ठ लिपीक | आस्थापनाविषयक बाबी | | | |

कृ.मा.प.

## पुणे विभाग

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव | राज्य जन माहिती अधिका-याचे पदनाम | राज्य सहायक जन माहिती अधिका-याचे पदनाम | विषय | राज्य जन माहिती अधिका-याच्या कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक | अपिलीय अधिकाऱ्याचे पदनाम | अपिलीय अधिकाऱ्याच्या कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| २ | सहायक संचालक, नगर रचना, बारामती शाखा, बारामती, जि.पुणे | नगर रचनाकार | सर्व संबंधित सहायक नगर रचनाकार | म.प्रा. नि.व न.र., अधि., १९६६ च्या अनुषंगाने बारामती शाखा अंतर्गत बाबी व इतर सर्व तांत्रिक बाबी | मुख्य इमारत, प्रशासकीय भवन, तिसरा मजला, इंदापूर बारामती रस्ता, बारामती, जि.पुणे- ४१३१०२. ०२११२-२२११५० | सहायक संचालक, नगर रचना, बारामती | मुख्य इमारत, प्रशासकीय भवन, तिसरा मजला, इंदापूर बारामती रस्ता, बारामती, जि.पुणे- ४१३१०२. ०२११२-२२११५० |
| | | | प्रथम लिपीक | आस्थापनाविषयक बाबी | | | |

**(मुळ मसूदा मा.संचालक यांनी मंजूर केला असे)**

मध्यवती कार्यालये, पुणे : ४११ ००१.
दिनांक : मे, २०२३

(वि.दुं.तळपे)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता.